**महाराष्ट्र शासन -कृषी विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५**
**दूरध्वनी क्र.**०२२-२२१६३३५१/२ **ई-मेल** :-mahapocra@gmail.com

जा.क्र.नादेकृसंप्र-०८१९/कृषिविद्या/बिजोत्पादन/प्र.क्र. १५४/२०१९/ ६०२ दि.३०.०८.२०१९

प्रति,
**प्रकल्प संचालक, आत्मा**
(प्रकल्पातील सर्व जिल्हे)

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत:-**
**हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे मार्गदर्शक सूचना सन २०१९-२०...**

उपरोक्त विषयास अनुसरून, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सन २०१९-२० करिता **हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे** हा घटक राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. प्रकल्प क्षेत्रामध्ये खरीप व रबी हंगामामधील पिकांच्या हवामान अनुकुल वाणांच्या नोंदणीकृत बिजोत्पादन कार्यक्रमास सदर घटकांतर्गत अर्थसहाय्य देय असेल. प्रकल्पातील पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील गावांमध्ये शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्थांच्या किंवा शेतकरी उत्पादक कंपनीच्या बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत सहभागी शेतकरी तसेच थेट बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करून बिजोत्पादन कार्यक्रम घेणारे शेतकरी यांना सदर घटकातून अर्थसहाय्य देय राहील.

महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांच्याकडून नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची यादी प्राप्त करून घ्यावी. समूह सहायक यांच्याकडून शेतकऱ्यांचे डीबीटीवर नोंदणी करून घेण्यात यावी व डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे संबधितांना जबाबदाऱ्या पूर्ण करणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

सोबत: वरीलप्रमाणे

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

प्रत,पुढील कार्यवाहिस्तव
१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व जिल्हे)
२. उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व जिल्हे)

# हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे

**प्रस्तावना:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्यातील व पश्चिम विदर्भातील सर्व जिल्ह्यांबरोबरच जळगाव आणि वर्धा जिल्ह्यातील ५१४२ गावांमध्ये बदलत्या हवामानानुसार अनुकुल शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात येत आहे. यासाठी शेतक-यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबरोबरच पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रकल्प क्षेत्रामध्ये घेण्यात येत असलेल्या प्रमुख पिकांच्या उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी गुणवत्तापूर्ण बियाणांचा वापर आवश्यक आहे. यासाठी प्रकल्प क्षेत्रातील कडधान्य, तेलबिया व तृणधान्य पिकांतील बियाणे बदलाचे प्रमाण वाढवणे क्रमप्राप्त आहे. म्हणून प्रमुख पिकांच्या हवामान अनुकुल वाणांचे बियाणे शेतक-यांना उपलब्ध करण्यासाठी प्रकल्पांतर्गत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. हवामान बदलास अनुकुल वाणांमध्ये कमी कालावधीत येणारे वाण, कीड व रोगास बळी न पडणारे किंवा प्रतिकार करु शकणारे वाण, पाण्याचा ताण सहन करणारे वाण इ. वर भर देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बाजारपेठेच्या अनुषंगाने उत्पादित वाणाची गुणवत्तादेखील योग्य असणे आवश्यक आहे.

प्रकल्प क्षेत्रातील प्रमुख पिकांच्या बिजोत्पादन साखळीचे सक्षमीकरणाच्या उद्देशाने पैदासकार बियाण्यापासून (ब्रिडर्स सीड) पायाभूत (फाऊंडेशन) बियाणे तसेच पायाभूत बियाण्यापासून प्रमाणित (सर्टीफाईड) बियाणे तयार करण्याचा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रकल्प क्षेत्रातील गावांमधील शेतकऱ्यांना "हवामान अनुकूल बियाणे वितरण प्रणालीची कार्यक्षमता वृद्धी" या उपघटकांतर्गत अर्थसहाय्य देय आहे.

**उद्देश :**

अ. प्रकल्प क्षेत्रामधील गावांमध्ये प्रमुख पिकांचे हवामान अनुकूल वाणांचे बियाणे उपलब्ध करणे.
आ. हवामान अनुकुल वाणांच्या बिजोत्पादन साखळीमध्ये छोट्या शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे.
इ. बिजोत्पादक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना सक्षम करून आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

**हवामान अनुकूल वाणांची निवड व बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी:**

१. प्रकल्प जिल्ह्यातील महत्वाची पिके विचारात घेऊन राज्यातील कृषि विद्यापीठे आणि देशांतर्गत संबधित पिकांच्या संशोधन संस्थांनी राज्यासाठी शिफारस केलेले हवामान अनुकूल वाण बिजोत्पादन कार्यक्रम आणि तंत्रज्ञान प्रसारासाठी वापरावेत अशा सूचना प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये देण्यात आल्या असून अशा वाणांची यादी सहपत्रित केली आहे. याशिवाय कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे (महाबीज) जिल्हा प्रतिनिधी यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार आणि शेतकऱ्यांचे पसंतीनुसार इतर हवामान अनुकूल वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येऊ शकतात. अशा वाणांचा बियाणे पैदासकाराकडून हवामान अनुकूल वाणांचे गुणधर्म नमूद करावेत व प्रकल्प व्यवस्थापन कक्षास कळविण्यात यावे.
२. प्रकल्प जिल्ह्यातील प्रमुख पिकांच्या पुढीलपैकी एक अथवा अनेक हवामान अनुकूल गुणधर्म असणाऱ्या, अधिक उत्पादन देणाऱ्या आणि प्रकल्प क्षेत्रासाठी शिफारस करण्यात आलेल्या वाणांसाठीच सदर घटकांतर्गत अर्थसहाय्य देय राहील. हवामान अनुकूल गुणधर्मांमध्ये कीड-रोगास बळी न पडणारा (Tolerant/Resistant),पाण्याचा ताण सहन करु शकणारा (Moisture stress tolerant), कमी कालावधीत येणारा (Short duration), क्षाराचा ताण सहन करू शकणारा (Salt tolerant) इत्यादींचा समावेश होतो.

३. बियाणे कायदा, १९६८ आणि भारतीय बीज प्रमाणीकरणाची किमान मानके १९८८ व २०१३ अन्वये राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रम नियंत्रित केला जातो. यासाठी महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेमार्फत हंगामनिहाय बिजोत्पादन कार्यक्रम नोंदणीसाठी प्रक्रिया जाहीर केली जाते आणि बिजोत्पादकांची नोंदणी करण्यात येते.
४. बीज प्रमाणीकरणासाठी बियाणे विक्री परवाना असलेल्या शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच वैयक्तिक शेतकरी किंवा शेतकरी गट थेट बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करू शकतात.

लाभार्थी निवड व अनुदान अर्हता:

१. प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या हवामान अनुकुल वाणांच्या नोंदणीकृत बिजोत्पादन कार्यक्रमास सदर घटकांतर्गत अर्थसहाय्य देण्यात येईल. शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्थांच्या किंवा शेतकरी उत्पादक कंपनीच्या बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत सहभागी शेतकरी तसेच थेट बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणीकरून बिजोत्पादन कार्यक्रम घेणारे शेतकरी सदर घटकांतर्गत अनुदानास पात्र राहतील.
२. प्रकल्प क्षेत्रामध्ये पिकांच्या हवामान अनुकुल वाणांच्या बिजोत्पादनाखाली जास्तीत क्षेत्र यावे म्हणून प्रकल्पांतर्गत गावांतील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याने इच्छुक शेतकऱ्यास जमिन धारणेबाबत कोणतीही अट असणार नाही. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणीकृत क्षेत्रापैकी प्रत्यक्ष बिजोत्पादनाखाली असलेले क्षेत्र अर्थसहाय्यास पात्र असेल.
३. शेतकऱ्याकडे आवश्यक संरक्षित सिंचन स्त्रोत उपलब्ध असणे गरजेचे आहे.
४. इच्छुक शेतकऱ्याने बिजोत्पादनासंबधी कौशल्य प्राप्त केलेले असावे अथवा कौशल्य प्रशिक्षण घेण्याची तयारी दर्शवावी.
५. बिजोत्पादक/ इच्छुक शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या प्रशिक्षण/क्षमता बांधणी घटकांतर्गत (C-१०) एक दिवसीय प्रशिक्षण महाबीज, बीज प्रमाणीकरण यंत्रणा व प्रकल्प संचालक (आत्मा) यांच्या समन्वयातून तसेच कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र यांच्या सहकार्याने आयोजित करावयाचे आहे. यासाठी जिल्हानिहाय व उपविभागनिहाय नियोजन प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे सादर करण्यात यावे.

अर्थसहाय्यासाठी समाविष्ट बाबी:

सदर घटकांतर्गत अर्थसहाय्यासाठी खालील बाबी समाविष्ठ आहेत.

अ. बिजोत्पादकाने पायाभूत/प्रमाणित बियाणे बिजोत्पादनासाठी अदा केलेली पैदासकार पायाभूत / बियाण्याची किंमत

आ. पायाभूत/प्रमाणित बियाणे उत्पादनासाठी बीज प्रमाणीकरण यंत्रणेने आकारलेले शुल्क (नोंदणी शुल्क, तपासणी शुल्क इ.) सदर दोन बाबी वगळता शेतकऱ्यास बिजोत्पादनासाठी येणाऱ्या इतर खर्चापोटी प्रस्तुत उपघटकांतर्गत अर्थसहाय्य लागू राहणार नाही .

अनुदान मर्यादा

प्रस्तुत प्रकल्पांतर्गत पायाभूत/प्रमाणित बियाणे उत्पादन या घटकासाठी अर्थसहाय्यासाठी समाविष्ट बाबींवरील प्रत्यक्ष खर्चाच्या १०० टक्के व कमाल रु. १५०००/- प्रती हेक्टर या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील. एका खातेदारास सदर अर्थसहाय्य कमाल १० हेक्टर बिजोत्पादन क्षेत्र मर्यादेपर्यंत व कमाल

रु.१.५ लाख मर्यादेपर्यंत अनुज्ञेय राहील. प्रस्तुत घटकांतर्गत पायाभूत बिजोत्पादनासाठी अनुदानाची परिगणना करणेसाठी संबधित अर्जदाराने जर कृषि विद्यापीठाकडून पैदासकार बियाण्याची खरेदी केली असल्यास केंद्र शासनाने कृषि विद्यापिठाकरिता निश्चित केलेल्या दरानुसार पैदासकार बियाण्याची विक्री किंमत ग्राह्य धरण्यात यावी. जर अर्जदाराने महाबीजकडून पैदासकार बियाण्याची खरेदी केलेली असल्यास महाबीजने निश्चित केलेल्या दरानुसार पैदासकार बियाण्याची विक्री किंमत ग्राह्य धरण्यात यावी. तसेच प्रमाणित बीजोत्पादनासाठी अनुदानाची परिगणना करणेसाठी कृषि विद्यापीठ आणि महाबीज यांनी संबधित वर्षाकरिता निश्चित केलेली पायाभूत बियाण्याची विक्री किंमत ग्राह्य धरण्यात यावी.

**घटक अंमलबजावणी कार्यपद्धती**

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये हवामान अनुकूल वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्याबाबत शासकीय, सहकारी, निमशासकीय संस्था, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, शेतकरी उत्पादक कंपनी/ गट इ. यंत्रणा/संस्थांमार्फत जनजागृती करावी.

२. बिजोत्पादक संस्थांनी बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडे रीतसर नोंदणी करावी.

३. बिजोत्पादक संस्थांनी नोंदणीकृत शेतकऱ्यांची तपशिलासह यादी आणि नोंदणी शुल्क भरल्याचे चलनाची प्रत संबधित उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांकडे सादर करावी.

४. बिजोत्पादक संस्थांनी बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी व अर्ज प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करावा व सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे अपलोड करावीत.

- ७/१२ उतारा
- शेतक-याचे हमीपत्र (उत्पादित बियाणे स्वतःच्या जबाबदारीवर विक्री करण्याबाबत आणि ना.दे.कृ.सं. प्रकल्पावर याची कोणतीही जबाबदारी राहणार नाही याबाबत ) (प्रपत्र-४)
- लाभार्थी वर्गवारीसाठी स्वतः साक्षांकित केलेली जातीच्या दाखल्याची प्रत

५. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सदर यादी व नोंदणी शुल्क चलनाची प्रत/ बिलाची प्रत पडताळणीसाठी समूह सहाय्यक/ कृषि सहाय्यकाकडे पाठवावी.

६. समूह सहायकांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे अर्ज पडताळणी करून ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेस सादर करावेत व समितीचा ठराव संकेतस्थळावर अपलोड करावा.

७. ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)यांनी समूह सहायक यांचेकडून प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांना मंजुरी दयावी.

८. कृषि सहायकांनी ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) ने मंजुरी दिलेल्या बिजोत्पादक शेतकऱ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी व पात्र शेतकऱ्यांचे अर्ज पूर्व संमती (तांत्रिक मान्यता) साठी ऑनलाईन पद्धतीने उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावे.

९. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे केलेली नोंदणी हाच मुख्य निकष विचारात घेऊन उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांनी बिजोत्पादक शेतकऱ्यांच्या अर्जांना पूर्वसंमती (तांत्रिक मान्यता) प्रदान करण्यात यावी.

१०. बियाणे उत्पादक यंत्रणेच्या/संस्थेच्या मार्गदर्शनानुसार अर्जदार शेतकऱ्याने पैदासकार/पायाभूत बियाणे खरेदी करून प्रत्यक्ष उत्पादन कार्यक्रम राबवावा व याबाबत कृषि सहायक यांना कळविण्यात यावे.

११. पेरणीनंतर कृषि सहायकांनी बिजोत्पादन प्रक्षेत्राची पाहणी करून प्रत्यक्ष बिजोत्पादन क्षेत्राचा अहवाल तयार करावा. शेतीशाळा प्रशिक्षक यांनी सदर बिजोत्पादन क्षेत्रास वेळोवेळी भेट देऊन सनियंत्रण करावयाचे आहे. तसेच शेतीशाळा समन्वयक यासंबधी तांत्रिक मार्गदर्शन करतील.

(प्रपत्र -५)

१२. बिजोत्पादक शेतकऱ्यांनी समूह सहायक/कृषि सहायक यांच्या सहायाने अनुदान मागणी ऑनलाईन पद्धतीने करावी व खालील कागदपत्रे अपलोड करावीत.

- पैदासकार/पायाभूत बियाणे खरेदी पावतीची मूळ प्रत
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे शुल्क अदा (नोंदणी शुल्क, तपासणी शुल्क इ.) केल्याच्या पावतीची मूळ प्रत
- कृषि सहायक यांचा प्रक्षेत्र पाहणी अहवाल

१३. कृषि सहाय्यकाकडून प्राप्त बिजोत्पादन प्रक्षेत्र पाहणी अहवाल व वरील कागदपत्रांच्या आधारे उपविभागीय कृषि अधिकारी यांनी बिजोत्पादक शेतकऱ्याचे अनुज्ञेय अनुदान वर्ग करणेसाठी डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पूर्ण करण्यात याव्यात.

विविध स्तरावरील जबाबदारी:

१. बिजोत्पादक यंत्रणा/संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी:

- प्रकल्प गावामध्ये हवामान अनुकूल वाणाचे बियाणे उत्पादनाचे महत्व शेतकऱ्यांना व ग्राम कृषि संजीवनी समितीस पटवून देणे आणि बिजोत्पादनास इच्छुक शेतकऱ्यांची निवड करणे.
- बिजोत्पादन कार्यक्रम घेण्यास इच्छुक शेतकऱ्यांना बिजोत्पादनातील तांत्रिक बाबी तसेच कायदेशीर मानके समजावून सांगणे.
- बिजोत्पादकांना शुद्ध बीज निर्मितीसाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करणे.
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे गावनिहाय बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी करून नोंदणीकृत बिजोत्पादक शेतकऱ्यांची यादी तपशिलासह उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करणे.
- बिजोत्पादक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे पुरवठा करणे. स्त्रोत बियाणे खरेदी आणि बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेल्या शुल्काच्या पावत्या शेतकऱ्यांना देणे.
- बिजोत्पादक शेतकऱ्यांबरोबर उत्पादित बियाणे खरेदी करण्याबाबत करार करणे.
- पेरणीनंतर बिजोत्पादन प्रक्षेत्र पाहणीचे वेळी कृषि सहायक/समूह सहायक यांच्या सोबत उपस्थित राहणे .
- प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्यासाठी शेतकरीनिहाय अनुदान प्रस्ताव तयार करण्यास संबधित कृषि सहायक/समूह सहायक यांना सहकार्य करणे.
- वर्षाच्या अखेरीस हंगामनिहाय आर्थिक वर्षात घेतलेल्या एकूण बिजोत्पादन कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करणे.

२. लाभार्थी:

- बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी बिजोत्पादन यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी करणे.
- बिजोत्पादनासाठी नोंदणीकृत शेतकऱ्यांनी समूह सहाय्यकाच्या मदतीने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नाव नोंदणी करणे व अर्थसहाय्यासाठी अर्ज प्रकल्पाच्या

https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करणे. तसेच सोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे.

- पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमासाठी बिजोत्पादन यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपन्या यांचेशी आवश्यक करार करून प्रस्तुत मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे उपलब्ध करुन घेणे.
- बिजोत्पादनासंबंधी बीज प्रमाणीकरण यंत्रणेस व बिजोत्पादन यंत्रणा/संस्थेस तसेच कृषि सहाय्यक /समूह सहाय्यक/शेतीशाळा प्रशिक्षक यांना पिकाच्या वाढीच्या विविध टप्प्यांबाबतची माहिती वेळोवेळी कळविणे.
- बीज प्रमाणीकरण नियमानुसार आवश्यक त्या अटी व शर्तींचे पालन करणे .
- अनुदान मागणी ऑनलाईन पद्धतीने करावी व सोबत पैदासकार/पायाभूत बियाणे खरेदीची पावती आणि बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेल्या शुल्काची पावती (नोंदणी शुल्क, तपासणी शुल्क इ.), प्रक्षेत्र पाहणी अहवाल अपलोड करणे.
- हवामान अनुकूल वाणांचे बियाणे वापरण्यास इतर शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

३. **ग्राम कृषि संजीवनी समिती:**

- पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमासाठी बीज प्रमाणीकण यंत्रणेकडे रितसर नोंदणी करण्यासाठी गावातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आणि अशा इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पांतर्गत उपलब्ध अर्थसहाय्याबद्दल माहिती देणे.
- नोंदणीकृत बिजोत्पादक शेतकऱ्यांनी प्रकल्प अर्थसहाय्यासाठी केलेले अर्जांची व अनुषंगिक कागदपत्रांची कृषि सहाय्यक/समूह सहायक यांचे मदतीने छाननी करणे.
- हवामान अनुकूल वाणांचे बियाणे वापरण्यास गावातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.
- अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.
- अत्यल्प व अल्पभूधारक बिजोत्पादक शेतकऱ्यांना बीजोत्पादनासाठी आवश्यक मुलभूत सुविधांसाठी प्रकल्पांतर्गत उपलब्ध बाबींची माहिती देणे.

४. **शेतीशाळा प्रशिक्षक:**

- बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्जकरण्यासाठी समूह सहायकांच्या सहायाने मार्गदर्शन व मदत करणे.
- बिजोत्पादक शेतकऱ्यांना बियाणे बदलाचे महत्व आणि बिजोत्पादन कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगणे.
- बिजोत्पादक शेतकऱ्यांच्या प्लॉट वर भेट देऊन त्यांना मार्गदर्शन व सनियंत्रण करणे.
- गावनिहाय, पीकनिहाय पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल दरमहा शेतीशाळा समन्वयक आणि उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करणे.

५. **समूह सहायक:**

- बिजोत्पादक यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपन्यांबरोबर समन्वय ठेऊन गाव समूहामधील शेतकऱ्यांना बियाणे बदलाचे महत्व आणि बिजोत्पादन कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगणे.
- बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
- शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने सादर केलेली कागदपत्रे कृषि सहाय्यक यांचे छाननीनंतर ग्राम कृषि संजिवनी समितीपुढे सादरकरणे व समितीचे इतिवृत्त संकेत स्थळावर अपलोड करणे.

- शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगणे . प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करण्यास कृषि सहाय्यक यांना मदत करणे.
- लाभार्थी व तपासणी अधिकारी यांचेसमवेत अंमलबजावणी पूर्वी व अंमलबजावणी नंतर प्रकल्प स्थळाचे अक्षांश-रेखांश सह फोटो काढणे. सदरचे फोटो प्रकल्पाच्या संगणक प्रणालीवर अपलोड करणे. (स्थळ पाहणी व मोका तपासणी वेळेस)

६. कृषि सहायक:

- बिजोत्पादक यंत्रणा/संस्था/शेतकरी उत्पादक कंपन्यांबरोबर समन्वय ठेऊन गाव समूहामधील शेतकऱ्यांना बियाणे बदलाचे महत्व आणि बिजोत्पादन कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगणे.
- बिजोत्पादन कार्यक्रमात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची माहिती जतन करावी व त्या माहितीनुसार बिजोत्पादक शेतकऱ्यांचा तपशील जसे स्त्रोत बियाणे खरेदीची पावती, बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेले शुल्क, ७/१२ उतारा इ. बाबतचा व अनुषंगीक बाबींची पडताळणी करणे.
- ग्राम कृषि संजीवनी समितीस बिजोत्पादन कार्यक्रमासाठी इच्छुक शेतकऱ्यांचे अर्जांची छाननी करण्यास मदत करणे.
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेमार्फत बिजोत्पादन क्षेत्रास भेटीचे वेळी उपस्थित राहून आवश्यक ते सहकार्य करणे
- पेरणीनंतर बिजोत्पादन प्रक्षेत्राची पाहणी करून अहवाल तयार करणे व डीबीटी प्रणालीवर अपलोड करणे.
- बिजोत्पादक शेतकऱ्यास अनुदान अदायगी करणेसाठी डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडणे.

७. उप विभागीय कृषि अधिकारी:

- प्रकल्प उद्देशास अनुसरून निवडलेल्या गाव समूहामध्ये बियाणे बदलाचे प्रमाण वाढवणे, हवामान अनुकूल वाणांचे बियाण्याची उपलब्धता वाढवणे, बिजोत्पादन उपक्रमास प्रोत्साहन देणे आणि महाबीज/ शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत बियाणे उत्पादन व पुरवठा प्रणाली सक्षम करणे ही उद्दिष्ट्ये समोर ठेऊन बिजोत्पादन कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
- बिजोत्पादक/ इच्छुक शेतकऱ्यांचे महाबीज, बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांच्या समन्वयातून तसेच कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र यांच्या सहकार्याने हंगामाच्या सुरुवातीस एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करणे.
- बिजोत्पादन यंत्रणा/ संस्थांमार्फत गाव/गावसमुहनिहाय बिजोत्पादन कार्यक्रमाची बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून नोंदणी करून घेणे.
- नोंदणीकृत बिजोत्पादकांची कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक/शेतीशाळा प्रशिक्षक यांचेमार्फत पडताळणी करून घेणे.
- ग्राम कृषि संजीवनी समितीच्या शिफारशीसह अर्ज प्राप्त झाल्यानंतर शेतकरीनिहाय तांत्रिक मान्यता /पूर्वसंमती देणे.
- बिजोत्पादन संस्थांकडून नोंदणीकृत शेतकऱ्यांना हवामान अनुकूल वाणांचे स्त्रोत बियाणे उपलब्ध केले जाईल याबाबत खात्री करणे.
- संबधित गावांचे कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक/शेतीशाळा प्रशिक्षक यांना बिजोत्पादनाबद्दल वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

- कृषि सहाय्यकांनी केलेल्या प्रक्षेत्र तपासणीबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय कृषि अधिकारी बिजोत्पादक शेतकऱ्याचे अनुज्ञेय अनुदान वर्ग करणेसाठी डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडणे.
- उपविभागांतर्गत राबविलेल्या बिजोत्पादन कार्यक्रमाची २% तपासणी करणे.

८. प्रकल्प संचालक (आत्मा):

- जिल्ह्यामध्ये उपविभागीय स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
- उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने किमान १% लाभार्थीची तपासणी करावी व विहित प्रपत्रात (प्रपत्र ३) अहवाल सादर करावा.
- बिजोत्पादक/ इच्छुक शेतकऱ्यांचे महाबीज, बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांच्या समन्वयातून तसेच कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र यांच्या सहकार्याने हंगामाच्या सुरुवातीस एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करणे.

९. निधीची तरतूद:

प्रकल्पाचे घटक आणि उपघटक सांकेतांक B३.१.१ खाली सदर बाबीचा खर्च करण्यात यावा. सदर खर्च सन २०१९-२० करिता मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**प्रकल्प जिल्ह्यांसाठी शिफारस केलेले हवामान अनुकूल वाण**

| पिकाचे नाव | कृषि विद्यापिठनिहाय हवामान अनुकूल वाण | | |
|---|---|---|---|
| | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी |
| कापूस (Arborium) | PA २५५, PA ५२८ | AK २०५-३ | JLA ५०५ |
| | | AKA-५, AKA-७, AKA-८ | |
| कापूस (Hirsutum) | NH ६१५ | AKH -९९१६, AKH -०८१ | - |
| कापूस (संकरीत) | NHH २५०(Non BT) NHH४४ (BT) | JKAKL- ११६ (BT), PKV Hy २ (BT) | - |
| कापूस (बीटी) | NH ६१५ | रजत, AKH ०८१, AKH ९९१६ | - |
| | CICRवाण: रजत Bt (CICR Bt २), AKH ०८१ Bt (CICR Bt -१२), | | |
| सोयाबीन | MAUS-६१२, MAUS-१५८, MAUS-७१ (समृध्दी), MAUS-१६२ | AMS-१००१ | DS-२२८ (फुले कल्याणी), फुले अग्रणी |
| | महाबीज वाण: JS २०-२९, JS ९३-०५, JS ३३५, JS-२०-९८, JS २०-६९, JS ९५-६० | | |
| | इतर वाण : MACS-११८८, MACS-१२८१ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| तूर | BDN ७१६ | AKPHM -११३०३ (संकरीत)<br>AKT-८८११ (सुधारित वाण) | विपुला |
| | BDN ७११ (पांढरी),<br>BSMR ७३६, BDN ७१६ | PKV Tara | |
| | | ICP ८८६३ (मारोती), ICPL ८७११९ (आशा) | |
| मूग | BM २००३-२,<br>BM २००२-१ | AKM १२-१८, AKM-८८०२, PKV AKM- ४, PKV-Moog-८८०२ | |
| | महाबीज वाण: उत्कर्षा | | |
| उडीद | - | AKU-१०-१ (PDKV Black Gold), TAU १, AKU-१५ | - |
| हरभरा | आकाश, BDNGK ७९८ (काबुली), | जाकी ९२१८ पी ,के व्ही काबुली ४१- | फुले विक्रांत, फुले विक्रम, दिग्विजय, विराट (Phule G-९५४१८), विजय (Phule G-८१-१-१), कृपा, विशाल (Phule G-८७२०७) |
| | इतर कृषि विद्यापीठ संशोधन संस्था: राजविजय-२०२, राजविजय-२०३, K ४-१ | | |
| रबी ज्वारी | परभणी मोती (SPV-१४११), परभणी ज्योती (SPV-१५९५) | पी के व्ही क्रांती (AKSV-९-R) | फुले वसुधा, फुले अनुराधा, फुले रेवती, फुले सुचित्रा, मालदांडी (M-३५-१) |
| करडई | कुसुम (PBNS-१२), | पीकेव्ही गुलाबी | |

***टीप :*** *कृषि विद्यापीठ व महाबीज यांचे सल्ल्यानुसार उपरोक्त वाणांचे व्यतिरिक्त इतर हवामान अनुकूल वाणांचा बिजोत्पादन कार्यक्रम घेता येईल. अशा वाणांचा बियाणे पैदासकाराकडून हवामान अनुकूल वाणांचे गुणधर्म नमूद करावेत व प्रकल्प व्यवस्थापन कक्षास कळविण्यात यावे.*

# Production of Foundation & Certified Seeds of Climate Resilient Verities

**Physical target in Ha**

## Financial target

**Financial target in Lakhs**

| District | No. of villages | No. of Clusters | 2019-20 | | 2020-21 | | 2021-22 | | 2022-23 | | 2023-24 | | Total Project Cost | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Phy | Fin | Phy | Fin | Phy | Fin | Phy | Fin | Phy | Fin | Phy | Fin |
| **Akola** | 498 | 69 | 3553 | 177.64 | 3923 | 196.16 | 5493 | 274.63 | 6277 | 313.86 | 6648 | 332.39 | **25894** | **1294.68** |
| **Amravati** | 532 | 56 | 2229 | 111.44 | 2461 | 123.06 | 3446 | 172.29 | 3938 | 196.90 | 4170 | 208.52 | **16244** | **812.20** |
| **Aurangabad** | 406 | 58 | 38 | 1.91 | 42 | 2.11 | 59 | 2.95 | 67 | 3.37 | 71 | 3.57 | **278** | **13.92** |
| **Bid** | 391 | 37 | 1609 | 80.46 | 1777 | 88.85 | 2488 | 124.39 | 2843 | 142.16 | 3011 | 150.55 | **11728** | **586.39** |
| **Buldana** | 441 | 82 | 2627 | 131.36 | 2901 | 145.06 | 4062 | 203.08 | 4642 | 232.09 | 4916 | 245.79 | **19147** | **957.37** |
| **Hingoli** | 240 | 25 | 2263 | 113.13 | 2499 | 124.93 | 3498 | 174.90 | 3998 | 199.89 | 4234 | 211.69 | **16491** | **824.54** |
| **Jalgaon** | 460 | 60 | 569 | 28.43 | 628 | 31.40 | 879 | 43.95 | 1005 | 50.23 | 1064 | 53.20 | **4144** | **207.21** |
| **Jalna** | 363 | 53 | 1170 | 58.50 | 1292 | 64.60 | 1809 | 90.44 | 2067 | 103.36 | 2189 | 109.46 | **8527** | **426.37** |
| **Latur** | 282 | 42 | 1847 | 92.33 | 2039 | 101.96 | 2855 | 142.74 | 3263 | 163.13 | 3455 | 172.76 | **13458** | **672.90** |
| **Nanded** | 384 | 34 | 868 | 43.39 | 958 | 47.91 | 1341 | 67.07 | 1533 | 76.66 | 1624 | 81.18 | **6324** | **316.21** |
| **Osmanabad** | 287 | 58 | 392 | 19.61 | 433 | 21.66 | 606 | 30.32 | 693 | 34.65 | 735 | 36.75 | **2860** | **142.98** |
| **Prabhani** | 275 | 39 | 3146 | 157.30 | 3474 | 173.70 | 4864 | 243.18 | 5558 | 277.92 | 5887 | 294.33 | **22929** | **1146.43** |
| **Wardha** | 125 | 12 | 654 | 32.72 | 723 | 36.13 | 1012 | 50.58 | 1156 | 57.80 | 1224 | 61.22 | **4769** | **238.44** |
| **Washim** | 149 | 22 | 1011 | 50.53 | 1116 | 55.80 | 1562 | 78.12 | 1786 | 89.28 | 1891 | 94.55 | **7366** | **368.28** |
| **Yevatmal** | 309 | 23 | 664 | 33.22 | 734 | 36.69 | 1027 | 51.36 | 1174 | 58.70 | 1243 | 62.16 | **4842** | **242.12** |
| **Total** | **5142** | **670** | **22639** | **1131.93** | **25000** | **1250.00** | **35000** | **1750.00** | **40000** | **2000.00** | **42362** | **2118.11** | **165001** | **8250.00** |

# प्रपत्र १

## हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाणांचे बिजोत्पादनः बिजोत्पादन अनुदान परिगणना

**वर्षः २०१९-२०**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **जिल्हाः** | | **उपविभागः** | | **तालुकाः** | | **गाव समुह क्रमांकः** | | | | **गावः** | | | **गावाचा कोड** | | | | | | **हंगाम** (खरीप/रबी) | | |
| अनु. क्र. | शेतकऱ्याचे नाव | प्रवर्ग | बिजोत्पादन प्रकार (पायाभूत / (प्रमाणित | बिजो त्पादन क्षेत्र (हे) | पिकाचे नाव | बियाणे वाण | बियाणे किंमत (कृषि विद्यापीठ /महाबीजच्या दरानुसार) (रु. प्रति किलो) | बियाणे वापर दर ( सीड रेट- किलो प्रति हेक्टर) | महाबीजचेबियाणे पुरावठादाराची पावती क्र. व तारीख | | | | | खरेदी केलेल्या बियाण्यापैकी प्रत्यक्ष वापर केलेले एकूण बियाणे (किलो) | एकूण बियाणे किंमत (रु) | बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडील खर्च | | | | अनुज्ञेय बाबीवरील एकूण खर्च (रु) | मापदंडानुसार बिजोत्पादन क्षेत्रासाठी कमाल देय अनुदान @रु. १५०००/हे प्रमाणे | प्रत्यक्ष अनुज्ञेय अनुदान (अनुज्ञेय बाबीवरील १००खर्च % रकाना २२ च्या मर्यादेत) (रु) |
| | | | | | | | | | स्रोत | पावती क्र. | तारीख | खरेदी केलेले बियाणे (किलो) | किंमत | | | पावती क्र. | तारीख | नोंदणी शुल्क (रु) | तपासणी शुल्क (रु.) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | (५ X ९) १५ | (८ X १५) १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ (१६+१९+२०) | २२ [(५) X रु. १५०००/हे] | २३ (१६+१९+२०) |
| १ | उदाहणार्थ | इतर | प्रमाणित | २.४० | सोयबीन | एम ए यु एस१ ५८ | ६३.१० | ७५.०० | महाबीज | १२ | ०६ /०६/ २०१८ | | | **१८०.००** | ११३५८.०० | १५.०० | २१ /०५/ २०१८ | ५०.०० | ६००.०० | १२००८.०० | ३६०००.०० | **१२००८.००** |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

प्रति,
मा. उपविभागीय कृषि अधिकारी

. . . . . . उप विभाग, जिल्हाः . . . . .

सदर माहिती महाबीज/............... शेतकरी उत्पादक कंपनी ,......... यांचे अहवालावरून घेतली असून खर्च प्रमाणकांची पडताळणी केली आहे. तसेच बिजोत्पादन क्षेत्रास भेट देऊन मोका तपासणी केलेली आहे. खरीप/रबी/वार्षिक सन ........... मधील प्रत्यक्ष बिजोत्पादनानंतर बीज प्रमाणीकरण यंत्रणेने नमूद केलेल्या क्षेत्रानुसार अनुदान गणना करण्यात आलेली आहे. करिता प्रत्यक्ष खर्चानुसार देय अनुदान रक्कम संबधित शेतकऱ्यांना डीबीटी प्रणालीद्वारे त्यांचे बँक खात्यात जमा करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

कृषि सहायक
..........., ता...........
उपविभाग................

## प्रपत्र -२

## (बिजोत्पादन प्रक्षेत्र पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय - समूह सहायक)

श्री/ श्रीमती-------------------------------------------मु. पो.-------------------ता.---------जि.------------------- यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. -----------मधील एकूण क्षेत्र -------------(हे. आर.) पैकी -------------(हे. आर.) क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे या घटकासाठी अर्ज केलेला आहे. बियाण्याच्या उत्पादनासाठी दिनांक ------------रोजी बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे केलेल्या नोंदणीच्या आधारे सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन बिजोत्पादन प्रक्षेत्राची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता.........हे. क्षेत्रावर लाभार्थ्याने बिजोत्पादक संस्था व बीज प्रमाणीकरण यंत्रणा यांचे मार्गदर्शनानुसार स्त्रोत बियाण्याची पेरणी केलेली आहे.

| अ क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | बिजोत्पादन क्षेत्राचा सर्वे नं./गट नं. | |
| २. | पिकाचे नाव | |
| ३. | पिकाचे वाण | |
| ४. | स्त्रोत बियाण्याचा प्रकार | पैदासकार / पायाभूत |
| ५. | स्त्रोत बियाणाची पेरणी केल्याचा दिनांक | |
| ६. | लाभार्थीने मागणी केलेल्या बिजोत्पादनासाठीचे एकूण क्षेत्र | .................हे. ...........आर |
| ७. | प्रत्यक्ष वापरलेले बियाणे | .......... कि.ग्रॅ. |
| ८. | बिजोत्पादक संस्था | |
| ९. | शेतामध्ये स्वमालकीच्या विहीर/बोअरवेल/इतर सिंचन सुविधा उपलब्ध आहे काय? | होय /नाही |

उपरोक्त लाभार्थ्याने अर्जासोबत सादर केलेल्या क्षेत्र गट नं./सर्वे नं.-------मध्ये ---------हे. क्षेत्र असून यापैकी सर्व्हे नं./गट नं.________मधील ______ हे. क्षेत्रावर ---------------- पिकाच्या -------------- या वाणाचे प्रमाणित/पायाभूत बियाणे उत्पादनासाठी घेतलेले आहे. सदर उपक्रमासाठी खरेदी केलेल्या स्त्रोत बियाण्याचा खर्च व बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे भरलेले शुल्क (नोंदणी शुल्क, तपासणी शुल्क इ.) या बाबींची पडताळणी केलेली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थी अर्थसहाय्यासाठी पात्र आहे.

**ठिकाण -**
**दिनांक -**

**(स्वाक्षरी)**
**समूह सहायक**
**नाव.........................**
**ता. .........................**
**जि. .........................**

(टीप-समूह सहाय्यक यांनी उपरोक्त क्षेत्र तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

प्रपत्र -३

पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणीवेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी:<br>___________(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)_________<br>मु.पो.___________________<br>ता. _________उपविभाग__________<br>जि._______ |
| ६. | बाब | हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत आणि प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ९. | बिजोत्पादक संस्थेचे नाव | |
| १०. | प्रकल्पाचा सविस्तर तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _______<br>२. बिजोत्पादन प्रकार: पायाभूत/प्रमाणित<br>३. एकूण बिजोत्पादन क्षेत्र------------हे.-----आर.<br>४. पिकाचे नाव ---------------वाण ---------------<br>५. स्रोत बियाणे पेरणी केल्याचा दिनांक ---------------- |
| ११. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम (रु.)<br>(बियाणे किंमत, नोंदणी शुल्क , तपासणी शुल्क इ.) | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |

| | |
|---|---|
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय |
| | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव...............................)

प्रपत्र-४

हमीपत्र

दि.

प्रति ,

**उपविभागीय कृषि अधिकारी ,**

उपविभाग,.. . .. . . . . . .

जि.. . . . . .. . . . . . . . .

**विषय: नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सन २०१९ २०-करिता हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत व प्रमाणित बियाण्याचे बिजोत्पादन तयार करणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयी मी, . . . . . . . . .. . . . .. . . . . . .. . . . . ., मु. पो.. . . . .. . . . , तालुका. .. . . . जि.. . . . . . . . . . . येथील रहिवाशी असून माझ्या मालकीचे स.नं./गट नं. ..........मधील एकूण क्षेत्र ................ (हे. आर.) पैकी .............(हे. आर.) क्षेत्रावर . . . . . .. . . ... .संस्थेमार्फत. . . . . . पिकाचे . . . . . . . .. . वाणाचे पायाभूत/प्रमाणित बियाण्याचे बिजोत्पादन घेणार आहे. मी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत/प्रमाणित बियाण्यांचे बिजोत्पादन तयार करणे या घटकासाठी दि. . . . . . . . . . या रोजी अर्ज केलेला आहे. बिजोत्पादन क्षेत्रास आवश्यक संरक्षित सिंचनाची सोय माझ्याकडे आहे/मी उपलब्ध करून घेईन. सदर बिजोत्पादन कार्यक्रमातून उत्पादित होणारे बियाणे संबधित संस्थेस व स्वत:च्या जबाबदारी वर विक्री करणार असून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पावर बियाणे विक्रीबाबत कोणतीही जबाबदारी राहणार नाही याची मी हमी देत आहे.

(लाभार्थीची स्वाक्षरी /अंगठा)

नाव . . . . . .. . . .. .

पत्ता . . . . . . . . .. .

प्रपत्र -५

बिजोत्पादन प्रक्षेत्र पेरणीपश्चात पाहणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. __________<br>वर्गवारी:_____________(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)_________<br>मु.पो.______________________<br>ता. __________उपविभाग____________<br>जि.________ |
| ३. | बिजोत्पादक संस्थेचे नाव | |
| ४. | पेरणी तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ________<br>२. बिजोत्पादन प्रकार: पायाभूत/प्रमाणित<br>३. एकूण बिजोत्पादन क्षेत्र------------हे. -----आर.<br>४. पिकाचे नाव --------------- वाण ---------------<br>५. स्त्रोत बियाणे पेरणी केल्याचा दिनांक ---------------- |

(स्वाक्षरी)
कृषि सहाय्यक
नाव..............................
सजा.............................
तालुका.........................
जि. .............................

प्रपत्र -६

बिजोत्पादन प्रक्षेत्र पेरणीपश्चात पाहणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी:____________(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)________<br>मु.पो.____________________<br>ता. _________उपविभाग__________<br>जि.________ |
| ३. | बिजोत्पादक संस्थेचे नाव | |
| ४. | पेरणी तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ________<br>२. बिजोत्पादन प्रकार: पायाभूत/प्रमाणित<br>३. एकूण बिजोत्पादन क्षेत्र------------हे. -----आर.<br>४. पिकाचे नाव --------------- वाण ---------------<br>५. स्त्रोत बियाणे पेरणी केल्याचा दिनांक ---------------- |

(स्वाक्षरी)
शेतीशाळा प्रशिक्षक / समन्वयक
नाव.............................
उपविभाग......................
जि. ............................